## जिल्हा परिषद पालघर विधी कक्षासाठी कंत्राटी वकील, मानधन तत्वावर नेमणेबाबत.

पालघर जिल्हा परिषद अंतर्गत प्रलंबित न्यायालयीन व अर्धन्यायीक प्रकरणे (सर्वोच्च न्यायालय,उच्च न्यायालय, कामगार न्यायालय, औदयोगिक न्यायालय, दिवाणी न्यायालय व विभागिय आयुक्त इ. न्यायालयीन प्रकरणे) हाताळण्यासाठी विधी कक्षाकरीता वकीलांची नेमणुका करणे प्रस्तावित आहे.

**पुढील अटी व शर्तींची पूर्तता करणा-या उमेदवारांमधून नेमणूक केली जाईल.**

१. उमेदवाराचे किमान वय २५ वर्षे व कमाल वय ६० वर्षे असावे.
२. बार काऊन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचे नोंदणीकृत असावा.
३. शैक्षणिक अर्हता (एल.एल.बी/एल.एल.एम) विधी शाखेची उच्च पदवीधारकांना प्राधान्य देण्यात येईल.
४. विविध न्यायालयात वकीलीचा अनुभव किमान ५ वर्ष असावा. ( जिल्हा परिषदेचा विविध प्रकरणांचा अनुभव असणा- यांना प्राधान्य देण्यात येईल.)

अर्ज करताना पूर्ण नांव, वय, पत्ता, मोबाईल नंबर, शैक्षणिक व कायदयाची पदवी उत्तीर्ण वर्ष, विविध न्यायालयात केलेल्या वकीलीचा अनुभव कालावधी, जिल्हा परिषदेतील न्यायीक प्रकरणांचा अनुभव, सध्या वकिलीच्या व्यवसायाचे ठिकाण इत्यादी तपशील असलेला Bio-Data संबधित कागदपत्रासह अर्जासोबत असावा.

सदर पदासाठी अर्ज ही जाहीरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून आठ दिवसाच्या आत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर, तळमजला कक्ष क्र. ००७, सेक्टर १५. जिल्हा परिषद पालघर, नविन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जवळ कोळगाव ग्रामपंचायत हद्द, बोईसर रोड, पालघर जि.पालघर, पिन कोड ४०१४०४ यांचे नावे पोहचतील अशा बेताने पाठवायचे आहेत. तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जाच्या संख्येप्रमाणे लेखी परिक्षा वा मुलाखत, घेतली जाईल.

नेमणूक झाल्यास जिल्हा परिषदेने ठरविलेले मानधन मान्य करावे लागेल याची नोंद घ्यावी.

दिनांक: ०४/12/२०२५

स्वाक्षरी/-
(मनोज रानडे, भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद पालघर**

ठिकाण:- पालघर